महाराष्ट्र शासन,जलसंपदा विभाग

**कार्यकारी अभियंता**

**नांदुर मधमेश्वर पाटबंधारे विभाग**

**वैजापूर,जिल्हा छत्रपती संभाजीनगर** (423701)

E Mail- nmidvjp@gmail.com / eenmcd.vjpr@wrd.maharashtra.gov.in

जाक्र.नामपाविवै /186 / दिनांक:-18 /01/2024

प्रति,

कार्यकारी अभियंता
प्रशासन सांगणिकीकरण विभाग
कोथरूड पुणे -38
ए मेल -sdeportal.acd@gmail.com

विषय : जलसंपदा विभागच्या संकेतस्थळवर जाहीर सूचना प्रसिद्धी देणे बाबत

उपरोक्त विषयास अनुसुरून अधीक्षक अभियता व प्रशासक लाभक्षेत्र विकास प्राधिकरण छत्रपती **संभाजीनगर** यांच्या अधिपत्याखाली असलेले विभागीय कार्यालयात सेवानिवृत अधिकारी व कर्मचारी विवक्षीत कामे करण्यासाठी सेवा करार तत्वावर अनुभवी सेवानिवृत अधिकारी (कनिष्ठ अभियंता /शाखा अभियंता) यांची सेवा करार पद्धतीने परिश्रमिक तत्वावर एकूण **10 (दहा)** पदाची तात्पुरती नियुक्ती करणे बाबत जाहीर सूचना जलसंपदा विभागच्या संकेतस्थळवर प्रसिद्धी देणे बाबत.

| अनू.क्र | विषय | तपशील (मराठीमध्य) |
|---|---|---|
| १ | अपलोड करण्यात येणारे धारिकाचा विषय | अधीक्षक अभियता व प्रशासक लाभक्षेत्र विकास प्राधिकरण छत्रपती **संभाजीनगर** यांच्या आधीपत्या खाली असलेले विभागीय कार्यालयात सेवानिवृत अधिकारी व कर्मचारी विवक्षीत कामे करनया साठी सेवा करार तत्वावर अनुभवि सेवानिवृत अधिकारी (कनिष्ट अभियंता /शाखा अभियंता) यांची सेवा करार पद्धतीने परिश्रमिक तत्वावर एकूण **10 (दहा)** पदाची तात्पुरती नियुक्ती करणे |
| २ | अपलोड करण्याबाबत मागणी करण्यात आलेले कार्यालयचे नाव | **कार्यकारी अभियंता**<br>**नांदुर मधमेश्वर पाटबंधारे विभाग**<br>**वैजापूर,जिल्हा छत्रपती संभाजीनगर** |
| ३ | अपलोड करण्याबाबत मागणी करण्यात आलेले पत्राचा दिनाक | अधीक्षक अभियता व प्रशासक लाभक्षेत्र विकास प्राधिकरण छत्रपती **संभाजीनगर यांचे पत्र क्र /ला क्षे वि प्रा /आस्था -१/३६ दि .०३/०१/२०२४** |
| ४ | माहिती किती कालावधी साठी अपलोड करावयाची आहे | २२/०१/२०२४ ते २९/०१/२०२४ |
| ५ | कारण | विवक्षीत कामे करनया साठी सेवा करार तत्वावर |
| ६ | संकेतस्थळवर माहिती कोठे अपलोड करावी यांचा तपशील | “जाहिरात “प्रसिद्धी ठीकाण |
| ७ | अपलोड करण्यात येणारे धारिकाची संख्या | १ (एक) |

**सोबत:- जाहीर सूचना पत्र**

**कार्यकारी अभियंता**
**नांदुर मधमेश्वर पाटबंधारे विभाग**
**वैजापूर,जिल्हा छत्रपती संभाजीनगर**

प्रत- मा.अधीक्षक अभियता व प्रशासक लाभक्षेत्र विकास प्राधिकरण छत्रपती संभाजीनगर यांना माहितीस्तव सादर
प्रत- जावक शाखा विभागीय कार्यलय च्या सूचना फलकावर डकविणेसाठी रवाना

# महाराष्ट्र शासन जलसंपदा विभाग
## कार्यकारी अभियंता
## नांदुर मधमेश्वर पाटबंधारे विभाग वैजापूर,जिल्हा, छत्रपती संभाजीनगर (423701)

E-mail : nmidvjp@gmail.com

## जाहिर सुचना

अधिक्षक अभियंता व प्रशासक लाभक्षेत्र विकास प्राधिकरण छत्रपती संभाजीनगर यांच्या अधिपत्याखाली असलेल्या विभागीय कार्यालयात सेवानिवृत अधिकारी व कर्मचारी विवक्षीत कामे करण्यासाठी सेवा करार तत्वावर अनुभवी सेवानिवृत अधिकारी (कनिष्ठ अभियंता/ शाखा अभियंता ) यांची सेवा करार पदधतीने पारिश्रमीक तत्वावर एकुण 10 (दहा ) पदांची तात्पुरती नियुक्ती करणेबाबत जाहिर सुचना

**संदर्भ:**-1.महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई -32 यांचे शासन निणर्य क्र.संकिर्ण /2715/प्र.क्र.-100/13 दिं.17/12/2016.

2.महामंडळ कार्यालयाचे पत्र क्र.गोमपाविमं/आ-2/6362 दिं.12/07/2022.

3.मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक लाभक्षेत्र विकास (जसंवि) छत्रपती संभाजीनगर यांचे पत्र क्र.लाक्षेवि(जसंवि) /आस्था-1/2668 दिं.19/07/2022.

4. अधिक्षक अभियंता व प्रशासक लाभक्षेत्र विकास प्राधिकरण छत्रपती संभाजीनगर यांचे पत्र क्र.लाक्षेविप्राऔ / आस्था-1/36 दिं.03/01/2024.

### अर्ज करण्याची पध्दत व सर्वसाधारण सुचना खालील प्रमाणे

1.अर्जदाराने फुलस्केपकागदावर स्वत:चे संपुर्ण नावं,जन्मदिनांक,वय,लिंग, शैक्षणिक अर्हता मोबाईल क्र.,ई-मेल आय डी, पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता, ज्या कार्यालयातुन सेवा निवृत झाले त्या कार्यालयाचे नावं, सेवानिवृतीचा दिनांक ,शासकिय सेवेत असतांना मिळालेले अंतिम वेतन व पदनाम तसेच सध्या मिळणारे निवृती वेतन याबाबतचा तपशिल टंकलिखीत करुन अर्ज सादर करावा.अर्जासोबत पेन्शन पे ऑर्डरची छायांकित प्रत जोडण्यात यावी.

2. वयोमर्यादा: दिनांक 31/01/2024 रोजी वय 65 वर्षापेक्षा जास्त नसावे.

3. अर्जदाराने त्यांचा अलिकडील पासपोर्ट आकाराचा फोटो अर्जावर चिकटवावा.

4. अर्जदारावर कोणताही फौजदारी गुन्हा दाखल नसावा तसेच विभागीय चौकशी/कारवाई चालु अथवा प्रस्तावित नसावी.

5. अर्जदारास मुलाखतीसाठी प्रवास खर्च दिला जाणार नाही.

6.सदर नियुक्ती ही निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असुन केव्हांही पुर्व सुचना न देता संपुष्ठात आणली जाईल.

7.अर्जदारास तात्पुरत्या स्वरुपाची नियुक्ती मिळाल्यास त्यांना विभागातंर्गत कार्यालयात अथवा कार्यक्षेत्रावर काम करावे लागेल याची नोंद घ्यावी.

8.कोणताही अर्ज स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार या कार्यालयाने राखुन ठेवला आहे.

9.नियुक्तीचा कालावधी 11 महिने राहिल.

10.अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख : दिनांक - 29/01/2024

11. अर्ज सादर करणेसाठी कार्यालयाचा पत्ता : कार्यकारी अभियंता, नांदुर मधमेश्वर पाटबंधारे विभाग वैजापुर या पत्यावर पोस्टाने अर्ज सादर करावे .

12.मुलाखतीचा दिनांक ,वेळ व ठिकाण वैयक्तीकरित्या मोबाईल क्रमांक व ई-मेल आय डी वर कळविण्यात येईल

13. मुलाखतीच्या वेळी पेन्शन पे आर्डर व शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्राची मुळ प्रत सोबत आणावी.

कार्यकारी अभियंता
नांदुर मधमेश्वर पाटबंधारे विभाग
वैजापुर